MHRG080011472022 **स.के.नं. ५५३/२०२२**

**सरकार वि. रंगा शिवाजी काळे**

# न्यायनिर्णय

## (ता.२३/०८/२०२२)

आरोपीने वरील गुन्हा कबुल केला आहे. आरोपीकडे मी प्रत्यक्ष विचारणा केली. त्याने कोणत्याही दबावास अथवा मोहास बळी न पडता गुन्हा कबुल केल्याची माझी खात्री पटली. त्यामुळे आरोपीला वरील गुन्हयासाठी दोषी धरणेत येत आहे. मी शिक्षेच्या मुद्दयावर आरोपीचे म्हणणे ऐकले. त्याने असे सांगितले की, त्याचेवर त्याचे कुटुंबाचे पालन पोषणाची जबाबदारी आहे, त्यामुळे त्याने कमीत कमी शिक्षा करणेची विनंती केली. वरील परिस्थिती व गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता आरोपीला सौम्य स्वरुपाची शिक्षा करणे न्यायाचित ठरेल, असे मला वाटते. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## –:आदेश:–

| | |
|---|---|
| ०१ | आरोपी नामे **रंगा शिवाजी काळे** यास मोटर वाहन कायदा कलम १८४ आणि १८५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५२ प्रमाणे दोषी धरणेत येत आहे. |
| ०२ | आरोपीला मोटार वाहन कायदा कलम १८४ खाली शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरिता न्यायालय उठेपावेतो साध्या कारावासाची शिक्षा सुनावणेत येत असून त्याने रक्कम रु. १,०००/- दंड म्हणून भरावेत. दंड न भरल्यास आरोपीने ३ दिवस साध्या कारावासाची शिक्षा भोगावी. |
| ०३ | आरोपीला मोटार वाहन कायदा कलम १८५ खाली शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरिता न्यायालय उठेपावेतो साध्या कारावासाची शिक्षा सुनावणेत येत असून त्याने रक्कम रु. २,०००/- दंड म्हणून भरावेत. दंड न भरल्यास आरोपीने ३ दिवस साध्या कारावासाची शिक्षा भोगावी. |

| | |
|---|---|
| ०४ | वरील सर्व शिक्षा एकत्रीत समवर्तीत होतील. |
| ०५ | या आदेशाची प्रत आरोपीला विनामुल्य देणेत यावी. |

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2022.08.24 11:26:18 +0530

दिनांकः २३/०८/२०२२
खालापूर.

**(पी.एम.माने )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, खालापूर